आरोग्य सेवा आयुक्तालय,
(महाराष्ट्र राज्य)
'आरोग्य भवन' सेंट जार्जेस रुग्णालय, आवार पी. डिमेलो रोड, मुंबई - ४००००१

| कार्यालय | दुरध्वनी ०२२ | Website : http:// arogya.maharashtra.gov.in |
|---|---|---|
| संचालक | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (अर्थव प्रशासन) | २२६२११८६ | Email : miscell@rediffmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | Email : aodesk2adhs@gmail.com |
| प्रशासकीय अधिकारी | २२६२६२०४ | |

क्रसंआसे/मवैआसे/२अ/टे-७/बंधप.(विशे.)/जा.क्र. ९१९ /२०
दि. २४ ९/२०२०

प्रति,
उपसंचालक, आरोग्य सेवा,
परिमंडळ नाशिक

विषय- बंधपत्रित (विशेषज्ञ) वैद्यकीय अधिका-यांच्या नियुक्ती बाबत.
संदर्भ- १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे पत्र
क्र.संवैशिवसंबंधपत्रित/मध्यवर्ती/समिती/निवड प्रक्रियाः २०१३/८अ, दि.३१/०७/२०१३
२) शासन निर्णय क्रमांक एमईडी - १००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२, दि.०८ फेब्रुवारी, २००८
३) शासन निर्णय क्रमांकः डब्ल्युपीएम - १०११/प्र.क्र.३५२/११/शिक्षण - २, दि.०४/०४/२०१२
४) संबंधित बंधपत्रित (विशेषज्ञ) उमेदवाराचे अर्ज

उपरोक्त विषयाच्या संदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी बंधपत्रित उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी रिक्त असलेले पद संस्था स्तरावर भरण्याबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणी बंधपत्रित विशेषज्ञ या पदी नियुक्ती मिळणेवावत संचालनालयास ०१ अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर उमेदवाराची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | दुरध्वनी क्रमांक | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | नियुक्ती द्यावयाचे मंडळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ अतुल पवन सिंगल | | एम.सी.एच. युरोलॉजीस्ट | २०१९ | नाशिक |

सदर उमेदवारास नियुक्ती देताना नमूद केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांची शैक्षणिक पात्रता व संबंधित मूळ कागतपत्रांच्या प्रती तपासून तसेच यापूर्वी संबंधित उमेदवारास बंधपत्रित उमेदवार

म्हणून १ वर्षाची नेमणूक देण्यात आलेली नसल्याची खात्री करुनच आपल्या स्तरावरुन प्राधान्याने आदिवासी भागातील आवश्यकतेनुसार जेथे पद रिक्त आहे, अशा ठिकाणी प्रथम बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून पदस्थापना देण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळविण्यात यावा.

आपल्या स्तरावरुन दिल्या जाणा-या नियुक्ती आदेशात पुढील अटींचा समावेश करावा.

" सदर वैद्यकीय अधिका-यास नेमणुक दिलेल्या ठिकाणीच संपूर्ण बंधपत्र कालावधी अखंडीत पूर्ण करणे आवश्यक राहिल."

संदर्भिय क्र.३ च्या शा.नि.मधील ( ब ) २ Xii वरील प्रक्रियेद्वारे नियुक्ती देण्यात आलेला उमेदवार त्याच्या नियुक्तीच्या ठिकाणी विहीत मुदतीत रुजू न झाल्यास वा सदर उमेदवाराने रुजू होऊन बंधपत्रित सेवा खंडीत केल्यास, सदर उमेदवाराने बंधपत्राचा भंग केला असे समजून योग्य ती पुढील कार्यवाही एकतर्फी करण्यात येईल. तथापि यास खालील प्रकरणी अपवाद करण्यात येईल.

I. जर एखाद्या महिला उमेदवाराची बंधपत्रित सेवा गर्भधारणेमुळे खंडीत झाली असेल तर अशा उमेदवारास पुढील नियुक्ती प्रक्रियेत नियमित उमेदवाराप्रमाणेच नव्याने अर्ज सादर करावा लागेल व नियुक्ती मिळाल्यास सदर उमेदवाराने बंधपत्रित सेवेस नव्याने प्रारंभ केला असे समजण्यात येईल.

II. एखाद्या उमेदवाराची बंधपत्रित सेवेच्या व्याख्येत मोडणा-या अन्य स्थायी सेवेत नियुक्ती झाल्यास सदर उमेदवाराची बंधपत्रित सेवा सदर उमेदवार उक्त स्थायी सेवेत रुजू झाल्यापासून नव्याने प्रारंभ झाली असे समजण्यात येईल.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२ दि.०८/०२/२००८ मधील परिच्छेद-२ ( २ ) व ३ ( २ ) येथील तरतुदीनुसार नियुक्ती दिलेला उमेदवार १५ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाला नाही , तर सदर शासन निर्णयामधील परिच्छेद-२ ( १ ) व ३ ( १ ) येथे नमूद केल्याप्रमाणे दंड वसूल करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण संबंधित अधिष्ठातांमार्फत कारवाई करण्यात येईल.

त्याचप्रमाणे जे वैद्यकीय अधिकारी बंधपत्रित कालावधी पूर्ण करतील त्यांची नावे व जे वैद्यकीय अधिकारी बंधपत्र कालावधी अर्धवट सोडतील त्यांची नावे वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालनालयास न चुकता सादर करावी....

24/9/2020.

(डॉ.साधना तायडे)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.